महाराष्ट्र शासन

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

तळमजला, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६१२ २०७६ Email ID: ddtp.ho@maharashtra.gov.in

---

-: कार्यालयीन आदेश :-

विषय : नगर रचना संचालनालयातील पदविकाधारक सहायक नगर रचनाकार (श्रेणी-२) यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय करणेबाबत...

संदर्भ :
१) मुख्य कार्यालयाचे कार्यालयीन आदेशक्र.विपस बैठक/समिती गठण/प्रशा-१/१९५४, दि.०२/०५/२०२३
२) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१/९५/बारा, दि.८ जून, १९९५.
३) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन ११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३, दि.२० जुलै, २००१.
४) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन-२००२/प्र.क्र.१/सेवा-३, दि.११ जानेवारी, २००२.
५) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन-११०९/प्र.क्र.४४/सेवा-३, दि.१ एप्रिल, २०१०
६) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन-११११/प्र.क्र.८/सेवा ३, दि.१ जुलै, २०११
७) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३, दि.०२ मार्च, २०१९.
८) शासन निर्णय, वित्त विभाग शुध्दीपत्रक क्र.वेतन-२०२३/प्र.क्र.१०/ सेवा-३, दि.२१ फेब्रुवारी, २०२४
९) मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांचे आदेश क्र.O.A.No.180 of 2024, दि.२७ जून, २०२४
१०) नगर विकास विभाग, शासन पत्र क्र.न्यायप्र-४०२४/४४०/प्र.क्र.९९/नवि-२७, दि.२१ जुलै, २०२४

**प्रस्तावना :-**

संदर्भ (२) दिनांक ८ जून १९९५ रोजीच्या शासन निर्णयान्वये, गट-क व गट-ड (वर्ग-३ व वर्ग-४) मधील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने आलेली कुंठीतता घालविण्यासंबंधीची कालबद्ध पदोन्नती योजना संदर्भ (३) दिनांक २० जुलै, २००१ रोजीच्या शासन निर्णयान्वये बंद करण्यात आली असून त्याऐवजी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना शासनाने लागू केली आहे. ही योजना पाचव्या वेतन आयोगानुसार रु.८०००-२७५-१३५०० व त्याहून कमी वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना लागू करण्यात आली आहे.

२. संदर्भ (४) दिनांक ११ जानेवारी, २००२ रोजीच्या शासन निर्णयान्वये, या योजनेचा लाभ अनुज्ञेय असलेल्या गट-अ मधील राजपत्रित तसेच गट-ब मधील राजपत्रित व अराजपत्रित अधिकारी/कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ मंजूर करण्याचे अधिकार राज्यस्तरीय विभाग प्रमुख/ प्रादेशिक विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आले आहेत.

३. संदर्भ क्र.(३) दि.२० जुलै, २००१ रोजीच्या शासन निर्णयान्वये, कार्यान्वित असलेली सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना संदर्भ क्र.(५) शासन निर्णय दि.१ एप्रिल, २०१० अन्वये, सुधारित स्वरुपात यापुढे **सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना या नावाने दि.१ ऑक्टोबर, २००६ पासून अंमलात आली आहे.** ही योजना कमाल वेतन बँड पीबी-३ (रु.१५६००-३९१००) + ५४००/- ग्रेड पे. घेणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना इतर शर्ती व अटीचे अधिन राहून सदर लाभ अनुज्ञेय केलेला आहे.

४. संदर्भ क्र.(६) दि.१ जुलै, २०११ अन्वये, दि.१ एप्रिल, २०१० रोजीच्या शासन निर्णयातील सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने संदर्भातील मुद्यांचे स्पष्टीकरण करण्यात आले आहे.

५. वित्त विभागाच्या संदर्भ क्र.(७) दि.०२ मार्च, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सातव्या वेतन आयोगामध्ये, तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना अनुज्ञेय केली आहे. सातव्या वेतन आयोगाच्या कार्यकाळामध्ये, १०, २० व ३० वर्षाच्या नियमित सेवेनंतरची, तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ही दि.०१/०१/२०१६ पासून अंमलात आली आहे. सदर शासन निर्णयात नमूद तरतुदीनुसार, रचना सहायक पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना सहायक संचालक, नगर रचना पदाची वेतनश्रेणी (रु.१५६००-३९१०० ग्रेड पे.६६००) (सातव्या वेतन आयोगानुसार वेतनस्तर एस-२३) तिसरा लाभ म्हणून अनुज्ञेय करण्यात आली आहे.

६. संदर्भ क्र.(८) अन्वये दि.०१/०४/२०१० रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२(ब)(३) **परिच्छेद पूर्णतः वगळण्यात येत असल्याबाबत** व परिच्छेद क्र.२ (क)(१) **मधील काही वाक्य वगळण्यात येत असल्याबाबत** शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात **आलेले आहेत. त्यामुळे आता नगर रचना संचालनालयातील सहायक नगर रचनाकार श्रेणी-२ अराजपत्रित संवर्गातील कर्मचाऱ्यांना दि.०७/०७/१९९७ रोजीच्या शासन निर्णयान्वये नियुक्तीच्या दिनांकापासून पाच वर्षाच्या सेवेनंतर देण्यात आलेली वेतनश्रेणी हा योजनेचा पहिला लाभ म्हणून गणन्यात येणार नाही.**

७. संदर्भ क्र.(९) अन्वये मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांचे आदेश क्र.O.A.No.180 of 2024, दि.२७/०६/२०२४ अन्वये अर्जदारांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ आदेशाच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत देणेबाबत आदेशित केले आहे.

८. शासन नगर विकास विभाग यांचे संदर्भ क्र.(१०) दि.२१/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये श्री.आनंदा राजाराम कांबळे व इतर १७१ यांनी विवक्षित सेवा कालावधीनंतर देण्यात येणारी अकार्यात्मक वरिष्ठ वेतनश्रेणी विचारात न घेता कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ अनुज्ञेय करण्यासाठी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मूळ अर्ज क्र.१८०/२०२४ दाखल केला आहे. सदर न्यायालयीन प्रकरणी मा.न्यायाधिकरणाने दि.२७/०६/२०२४ रोजी पुढील प्रमाणे आदेश देऊन प्रकरण निकाली काढलेले आहे.

Ld. Advocate for the applicant refers to para 8 of the affidavit in reply dated 06.05.2024 filed by Shrikant Marutirao Deshmukh, Deputy Director of Town Planning, Greater Mumbai and states that the matter regarding grant of 1st, 2nd and 3rd benefit of ACP Scheme has been complied with and OA can be disposed off with a direction to the respondents to decide the issue within stipulated period.

Ld.PO submits to the order of the Court.

The respondents are directed to decide the issue of ACP Scheme of the applicant within a period of two months from today. OA disposed off accordingly.

९. मा.न्यायाधिकरणाचे उक्त आदेश विचारात घेता, नगर रचना आणि मूल्यनिर्धारण संचालनालयातील रचना सहायकांना वित्त विभागामार्फत दि.०१/०४/२०१० व दि.०२/०३/२०१९ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयासंदर्भात वित्त विभागामार्फत दि.२१/०२/२०२४ रोजी निर्गमित केलेल्या दोन शासन शुध्दीपत्रके विचारात घेऊन, आवश्यक ती नियमोचित कार्यवाही करावी, असे कळविले आहे.

१०. उपरोक्त नमूदनुसार मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मूळ अर्ज क्र.१८०/२०२४ च्या अनुषगाने दि.२७/०६/२०२४ रोजी पारित झालेले आदेश व उक्त सर्व शासन निर्णय विचारात घेऊन तसेच दिनांक १ एप्रिल, २०१० व दि.०२/०३/२०१९ रोजीच्या शासन निर्णयातील अटींच्या अधीन राहून नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभागातील अधिकाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा यापूर्वी देण्यात आलेला पहिला/ दुसरा लाभ सुधारित करणेबाबत व ज्या अधिकाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार १०, २० व ३० वर्षाच्या सेवेनंतर अनुज्ञेय होत असलेले लाभ मंजूर करण्याबाबत सोबत जोडलेल्या -१ अनुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे पुढीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहेत :-

**-: आदेश :-**

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभागातील गट-अ आणि गट-ब (राजपत्रित) मधील अधिकाऱ्यांना संदर्भ क्र.(३), (५) व (८) च्या आदेशास अनुसरुन सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला, दुसरा व तीसरा लाभ मंजूर करण्यात आलेला आहे. संदर्भ क्र.(९) चे शासन निर्णयान्वये, संदर्भ क्र.५ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२(ब) (३) पूर्णतः वगळण्यात आला असून परिच्छेद क्र.२ (क) (१) मधील काही वाक्य वगळण्यात येत असल्याबाबतचे शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे. त्यास अनुसरुन व उपरोक्त नमूद नुसार मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मूळ अर्ज क्र.१८०/२०२४ च्या अनुषंगाने दि.२७/०६/२०२४ रोजी पारित झालेले आदेश व संदर्भिय सर्व शासन निर्णय विचारात घेऊन नगर रचना संचालनालयातील, **रचना सहायक पदावरील नियुक्तीच्या वेळी "स्थापत्य अभियांत्रिकी पदविका" अशी शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या अधिकाऱ्यांना** संदर्भ क्र.(३), (५) व (८) च्या शासन निर्णयास अनुसरुन देण्यात आलेल्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या लाभाच्या दिनांकामध्ये सुधारणा करुन, सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला/दुसरा/तिसरा सुधारित लाभ मंजूर करण्याबाबत संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य, पुणे हे सोबत जोडलेल्या जोडपत्र "अ" मध्ये दर्शविल्याप्रमाणे खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून आदेश निर्गमित करीत आहेत. उर्वरीत अधिकाऱ्यांबाबत त्यांना संदर्भ क्र.(३), (५) व

(८) च्या आदेशास अनुसरुन यापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या लाभाच्या दिनांकात कोणताही बदल होत नसल्याने त्यांचेबाबत पूर्वीचेच आदेश कायम राहतील. सोबत जोडलेल्या जोडपत्र "अ" मधील अधिकाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा सुधारित लाभ खालील अटींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

१. महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम क्र.११(१) खालील पदोन्नतीच्या पदाच्या वेतनश्रेणीतील वेतन निश्चितीसाठी द्यावयाच विकल्प अनुज्ञेय आहे. त्यांनी तसा विकल्प हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आत संबंधित कार्यालयास सादर करावा. त्यानंतर आलेल्या विकल्पाचा विचार केला जाणार नाही, आणि त्यांची वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियन क्र.११(१) (ए) नुसार केली जाईल.
२. जे अधिकारी सद्यस्थितीत प्रतिनियुक्तीवर आहेत त्यांच्या बाबतीत ते प्रतिनियुक्तीवर जाण्यापूर्वी ज्या कार्यालयात कार्यरत होते त्या कार्यालयाने त्यांना वरील योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही करावी.
३. सद्यस्थितीत जे अधिकारी सेवानिवृत्त झाले आहेत / ज्यांचे निधन झाले आहे, अशा अधिकाऱ्यांच्या बाबतीत ते ज्या कार्यालयात कार्यरत होते त्या कार्यालयाने त्यांना वरील योजनेचा लाभ देण्याची आवश्यक ती कार्यवाही करावी.
४. वरिष्ठ वेतनश्रेणीतील वेतन निश्चितीत मिळालेला लाभ हा त्याच वेतनश्रेणीत कार्यात्मक (functional) पदोन्नती मिळाल्यानंतर पुन्हा देय होणार नाही. या योजनेअंतर्गत पदोन्नत पदाची वेतनश्रेणी मिळाली तरी उपरोक्त अधिकारी यांची नावे (मूळ) कनिष्ठ संवर्गाच्या जेष्ठता सूचीतच राहातील.
५. जोडपत्र-अ मधील अधिकारी यांना भविष्यात पदोन्नती दिल्यानंतर जर त्यांनी पदोन्नती नाकारली किंवा ते नियमित पदोन्नतीस अपात्र ठरले तर, पदोन्नती नाकारल्याच्या दिनांकापासून किंवा नियमित पदोन्नतीस अपात्र ठरल्याच्या दिनांकापासून त्यांना या योजनेअंतर्गत देण्यात आलेल्या वरिष्ठ पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ काढून घेण्यात येईल. मात्र त्यापूर्वी देण्यात आलेल्या आर्थिक लाभाची वसुली करण्यात येणार नाही. तसेच, असे लाभ काढून घेतल्यानंतर संबंधितांची वेतननिश्चिती ही त्यांना जणू काही या योजेनेचे लाभ देण्यात आले नव्हते असे समजून, महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम १२ च्या तरतूदीनुसार करण्यात येईल.
६. शासन निर्णय दि.१ जुलै, २०११ सोबतचे परिशिष्ट-अ मधील मुद्दा क्र.१३ मधील स्पष्टीकरण विचारात घेता सदर अधिकारी/ कर्मचाऱ्यांची जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त असल्याने त्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा आर्थिक लाभ मंजूर करण्यात येत आहे.
७. जे अधिकारी हे दि.०१/१०/२००६ ते दि.३१/०३/२०१० या दरम्यान शासन सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत अथवा ज्यांचे शासन सेवेत कार्यरत असताना सदर कालावधीदम्यान निधन झाले आहे. त्यांच्याकडून सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ मंजुरीबाबतच्या अटींची पूर्तता झाल्यानंतर त्यांना वेतननिश्चितीचा प्रत्यक्ष लाभ हा फक्त निवृत्ती वेतन विषयक/कुटूंब निवृत्ती वेतन विषयक लाभाकरिताच म्हणजेच निवृत्ती वेतन/ कुटूंब निवृत्ती वेतन, सेवा निवृत्ती उपदान/मृत्यू उपदान

तसेच रजा रोखीकरण या लाभ मंजुरीच्या प्रयोजनार्थ अनुज्ञेय राहील. **संबंधित अधिकारी कर्मचारी यांना दुसरा लाभ मंजुरीच्या अनुषंगाने थकवाकीची रक्कम अनुज्ञेय** राहणार नाही. त्यानुषंगाने दि.११ मे, २०१७ अन्वये दि.०९ डिसेंबर, २०१६ च्या शुध्दीपत्रकातील मुद्यांच्या अनुषंगाने स्पष्टीकरणात्मक शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे.

८. या आदेशान्वये मंजूर करण्यात येत असलेल्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या लाभाची नोंद संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकात घेण्यात यावी.

(मसुदा मा संचालक, नगर रचना यांनी मंजूर केला असे)
जा.क्र.आस्था/गट-अ व ब/सु.से.आ.प्र.यो./प्रशा-१/ ५९०६
मध्यवर्ती कार्यालये, पुणे - ४११ ००१
दिनांक - ३०/१०/२०२४.

30/10/2024
( वि.ल.वाघमोडे)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरीता

प्रत : मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, नवि-२७/नवि-३, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

प्रत : मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

प्रत : मा.महालेखापाल, मुंबई-१/नागपूर-२.

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी :**

१. सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग /कोकण विभाग / नागपूर विभाग.
२. सहायक संचालक, नगर रचना, ठाणे शाखा / नागपूर शाखा.
३. भूमि संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक क्र.२, पिंपरी, पुणे
४. जिल्हा कोषागार अधिकारी,--------------------.
५. कार्यासन अधिकारी, प्रशा- १अ / १ ब/ प्रशा-२/लेखा /अर्थसंकल्प /अभिलेख/ रेखाकला, टिपीव्ही-१ / २ / ३ / ४ /५ / ६ / ७, मुख्य कार्यालय, पुणे.
६. सर्व संबंधित अधिकारी (विहित मार्गाने)
७. श्री.पालकर, स्वी.स. / श्रीमती दाभाडे / श्री.चंद्रस, उ.श्रे.ल.ले.
८. श्री.नि.बा.कंठाळे, कनिष्ठ लिपिक, प्रस्तुत आदेश संचालनालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावेत.
९. वैयक्तिक धारिका.
१०. श्री.वि.शि.जाधवर, वरिष्ठ लिपिक, प्रस्तुत आदेशामध्ये देण्यात आलेल्या सु.से.आ.प्र.योजनेच्या लाभाची नोंद ज्येष्ठता सूचीमध्ये घेण्यात यावी.

**प्रत विहित मार्गाने रवाना :-**

१. श्री.प्रे.मा.शिरवाडकर, सहायक नगर रचनाकार (से.नि.), सहायक संचालक, नगर रचना, ठाणे शाखा ठाणे.
२. श्री.श.न.पठाण, सहायक नगर रचनाकार (से.नि.), सहायक संचालक, नगर रचना, नागपूर शाखा, नागपूर.
३. श्रीमती उ.वि.विश्वासराव, सहायक नगर रचनाकार (भूमि संपादन विशेष अधिकारी, वि.घ. क्र.२, पिंपरी, पुणे कार्यालय)

---XXX---

## विवरणपत्र-३

ज्या अधिकाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ म्हणून नगर रचनाकार गट-अ या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी, पाचव्या वेतन आयोगानुसार रुपये.८००० १३५००/-, सहाव्या वेतन आयोगानुसार रुपये १५६००-३९१०० (ग्रेड वेतन रु.५४००/-) व सातव्या वेतन आयोगानुसार एस-२० रुपये ५६१००-१७७५००/- तसेच दुसरा लाभ म्हणून सहायक संचालक, नगर रचना (गट-अ) या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी सहाव्या वेतन आयोगानुसार रुपये १५६००-३९१००/- (ग्रेड वेतन रु.६६००/-) व सातव्या वेतन आयोगानुसार एस-२३ रु.६७७००-२०८७००/- मंजूर करण्यात येत आहे अशा अधिकाऱ्यांची माहिती दर्शविणारे जोडपत्र.

| अ. क्र. | नाव | प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | खात्यात प्रवेश केल्याचा दिनांक | सहायक नगर रचनाकार दर्जा मंजूर केल्याचा / त्यावेळेच्या सूचनांनुसार पहिल्या लाभाचा दिनांक | त्यावेळच्या सूचनांनुसार यापूर्वी मंजूर केलेल्या दुसऱ्या लाभाचा दिनांक | त्यावेळच्या सूचनांनुसार यापूर्वी मंजूर केलेल्या तीसऱ्या लाभाचा दिनांक | दि.२१/०२/२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार पहिल्या लाभाचा सुधारित दिनांक | दि.२१/०२/२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार दुसऱ्या लाभाचा सुधारित दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| सहायक नगर रचनाकार | | | | | | | | | | |
| १ | श्री.प्रे.मा.शिरवाडकर | इ.मा.व. (वैध) | डी.सी.ई. | १२/०६/१९८६ | १२/०६/१९९१ | १२/०६/२००३ | -- | -- | ०१/०८/२०१३ | सेवानिवृत्त |
| २ | श्री.श.न.पठाण | इ.मा.व. (वैध) | डी.सी.ई. | २०/०८/१९८७ | २०/०८/१९९२ | २०/०८/२००४ | -- | ०१/०८/२००१ | -- | सेवानिवृत्त |
| ३ | श्रीमती उ.वि. विश्वासराव | इ.मा.व. (वैध) | डी.सी.ई. | ०९/०७/२०१२ | ०९/०७/२०१७ | -- | -- | ०९/०७/२०२२ | -- | -- |

(मसुदा मा संचालक, नगर रचना यांनी मंजूर केला असे)

३०/१०/२०२४

( वि.ल.वाघमोडे )
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरीता